Rotary 2020-2021

# southern star ...अवघे धरू सुपंथ

The official bulletin of Rotary Club of Pune South

Year : 51, Vol : 3, SEPTEMBER 2020

**LIFE IS AN**

**EXCITING BUSINESS,**

**AND MOST EXCITING WHEN**

**IT IS LIVED FOR OTHERS...**

*Helen Keller*

**President :** Rtn. Sudarshan Natu | **Secretary :** Rtn. Manisha Belgaonkar | **Editor :** Rtn. Yogesh Nandurkar

## Polio Free Africa

Rtn. Abhijit Deshpande (AB)

The World Health Organization's African region is officially certified free of the wild poliovirus! This has been due to the dedicated and relentless efforts of the numerous Rotary members, health workers, donors, government leaders, and partners.

Rotary has been working to eradicate polio for more than 30 years. As a founding partner of the Global Polio Eradication Initiative, Rotary has reduced polio cases by 99.9 percent since its first project to vaccinate children in the Philippines in 1979.

Rotary has helped immunise more than 2.5 billion children in 122 countries and has contributed more than $1.8 billion toward eradicating the disease worldwide.

Today, polio remains endemic only in Afghanistan and Pakistan. But it's crucial to continue working to keep other countries polio-free.

Learn about Rotary initiatives to fight polio here: https://on.rotary.org/2YPCRpt

## Basic Education & Literacy

Rtn. Abhijit Deshpande (AB)

Rotary Clubs worldwide have been doing groundbreaking work in this area. Rotary works in the following areas towards improving literacy levels worldwide:

***TEACHER TRAINING***

We share our knowledge and experience with educators and other professionals who work with vulnerable populations. Examples of these projects are the Guatemala Literacy Project and Nepal Teacher Training Innovations (NTTI). You can find out more about these here:
https://www.rotary.org/en/teaching-teachers-key-literacy

***ADULT LITERACY***

Rotary members fight adult illiteracy by working with local advocates to offer community literacy programs.

***ROTARY SCHOLARSHIPS***

Rotary members invest in the future by giving scholarships to students who have the potential to change our communities.

***EDUCATING REFUGEES***

Being a refugee also disrupts education amongst other things and thus threatens to put the life of refugees into permanent hardships. Rotary clubs and been working in refugee camps to bring education and food to refugees. A classic example is the America University of Nigeria chapter of the Yola Rotary Club. Read the whole story here: https://www.rotary.org/en/rotarian-helps-boko-haram-victims-nigeria

***SCHOOLS4FREEDOM***

The Rotarian Action Group Against Slavery (RAGAS has a strategy for fighting modern slavery that's working at the local level. With the help of 13 clubs, a district grant through the Rotary Club of Binghamton, New York, USA, and other sources, the action group is providing $36,000 toward the work of Schools4Freedom, a project of the organization Voices4Freedom. Schools4Freedom is working in Uttar Pradesh with local partner organization Manav Sansadhan Evam Mahila Vikas Sansthan (MSEMVS) to battle debt bondage. Read this inspiring story here: https://www.rotary.org/en/education-breaks-cycle-slavery

Thanks to the efforts of Rotary Clubs, numerous NGOs, and dedicated individuals, the basic literacy levels at least in urban areas has improved. Hence I would like to give the theme month a twist:

With the increase in digital cashless transactions, basic digital literacy has also become the need of the hour. I would like to suggest that each of us vow to impart basic digital literacy training to at least one person in this month. It can be anyone right from an elderly person in your house or even the "maushi" selling vegetables in your neghbourhood. You can teach them how to send and receive money via BHIM UPI or any other popular digital payment service. BHIM UPI is available in all regional languages too and you can use it even without a smartphone (via SMS and IVR). While learning to use the payments app, those who cannot read and write will automatically learn to read and write at least numbers. And while you are at it, do not forget to also teach them the basic security measures that they need to look at, like not sharing their OTP and PIN.

I think this would be a great initiative, so are you up for it?

- रोटरीनं प्रत्येक महिना विशिष्ट कामासाठी योजला आहे. त्याबद्दल महत्त्व आणि काय करायचं हे सांगणारं पान
- शिवाय रोटरी इंटरनॅशनलबद्दल काही विशेष

**रोटरी**

तुमचा लेख आवर्जून द्या..
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

# गुरुमंत्र– डिजिटल लिटरसी उपक्रम

रो. उद्धव गोडबोले













गुरुमंत्र – आयटी स्किल्स फॉर स्मार्ट टिचिंग हा डिस्ट्रिक्ट ३१३१ आयोजित उपक्रम १० ते १५ ऑगस्ट २०२० या कालावधीत पार पडला. या उपक्रमात प्रामुख्याने शिक्षकांना व इतरांनासुद्धा शिकवताना उपयुक्त ठरणारी पंधरा महत्त्वाची आयटी कौशल्ये व्हिडिओच्या माध्यमातून शिकवण्यात आली. (उदा. साउंड रेकॉर्डरचा वापर... इत्यादी) यासाठी प्रत्येक क्लबचे दोन व्हॉट्सॲप समूह तयार करण्यात आले होते.

झूम मिटिंगऐवजी व्हिडिओ असल्यामुळे प्रत्येक सहभागीला आपल्या सोयीच्या वेळात रोज तीन व्हिडिओ बघून कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळाली. पहिल्या दिवसाच्या व्हिडिओवर आधारित काही प्रश्न दुसऱ्या दिवशी विचारले जात होते आणि तिसऱ्या दिवशी त्यांची उत्तरे पाठवली जात होती... त्यामुळे सहभागींना आपल्याला कौशल्य व्यवस्थित प्राप्त झाले आहे का हे तपासता येणे शक्य झाले.


या अभ्यासक्रमाच्या शेवटी एक ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली. किमान ४०% गुण प्राप्त केलेल्या सहभागींना इ–प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

आपल्या सर्व सभासदांनी आणि विशेषतः रो. पी. पी. सुधांशू गोरे सर यांनी या उपक्रमाच्या माहितीचा प्रसार केल्यामुळे आपल्या दोन्ही गटांमध्ये मिळून महाराष्ट्रभरातून सुमारे तीनशे ऐंशी शिक्षक आणि शिक्षकेतर मंडळी उत्साहाने सहभागी झाली. यामध्ये आपल्या सभासदांचा विशेषतः ॲन्सचा सहभाग लक्षणीय होता. यातल्या बहुसंख्य सहभागींनी परीक्षा उत्तीर्ण करून प्रमाणपत्र मिळवले. हा उपक्रम अतिशय लाभदायी ठरला असल्याबाबतचे उत्तम अभिप्राय या सहभागींकडून आले आहेत. हे व्हॉट्सॲप समूह अजून अस्तित्वात असून यापुढे त्यांच्यासाठी असेच आणखी शैक्षणिक उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

या उपक्रमाद्वारे रोटरीबद्दल बऱ्यातच मंडळींना महिती मिळू शकली हा एक महत्वाचा पी–आर लाभ झाला. या उपक्रमात आपल्याला मौलिक मार्गदर्शन केल्याबद्दल डिस्ट्रिक्ट टीमच्या रो. पी. पी. शामला जोशी यांचे मनःपूर्वक आभार.

## *Rotary 3131 Mobile App*

Rtn. Abhijit Deshpande (AB)



Rotary District 3131 has revamped its official Android App and released updates on the Google Play Store. This app has a host of features.

Some of the major ones are:

**Club Rooster, Club Meetings, Club Projects, and Club Celebrations**

You can attend club meetings directly via Zoom through this app. There is also a facility to register in advance if you plan to attend a meeting. If you attend the zoom meeting via the app, your attendance will be marked automatically. Once we start physical meetings, you can mark your attendance by simply scanning a QR code via the app. There are also mobile alerts about meetings and specific announcements. You can also read the club bulletin in a PDF using the app.

Apart from club-related information, the app also has a lot of information about the District such as District Committees, Member Search, District Events, etc.

We strongly recommend that all members download this app on their Android phones.

To download the app click on the link below:

https://play.google.com/store/apps/details?id=com.dcpl.rotarydistrict

The iOS version of the app will soon be available. We will let everyone know once it is available.


- आपला क्लब रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ मध्ये येतो.
- डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रश्मी कुलकर्णी यांचा संवाद
- या डिस्ट्रिक्टमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम
- डिस्ट्रिक्टमधील क्लब्सचे महत्त्वाचे, दखलपात्र असे प्रोजेक्ट्स

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

**डिस्ट्रिक्ट कनेक्ट**

# भारत परिक्रमा – एक्सप्लोअर ‘स्वति’

**रो. रश्मी परुळकर**




**वक्ते – प्रीती आणि स्वरूपा दामले**
**दिनांक – ३ ऑगस्ट २०२०**

सौ. प्रीती दामले, पूर्वाश्रमीची सोमण ही माझी नागपूरची अकरावीत असतानाची मैत्रीण. गेली तीस वर्षे आम्ही ही मैत्री जपून ठेवली आहे. ती समवेदना या संस्थेची सीईओ आहे.

साहसी गोष्टी करायची आवड तिला पहिल्यापासूनच आहे. आम्ही मैत्रिणींनी मिळून घरी कळू न देता बरीच साहसे केली आहेत.

नोव्हेंबर २०१९मध्ये तिने तिच्या वीस वर्षांच्या मुलीसमवेत केलेले हे धाडस फार वेगळे आहे. सत्तावीस दिवसांत सतरा राज्यांतून वॅगन आर कार स्वतः चालवत केलेली आठ हजार नऊशे किलोमीटरची परिक्रमा हा एक साहसी अनुभव आहे. प्रवास करायचा ठरले.

घरच्यांची परवानगी मिळाली आणि मग त्यांच्या तयारीला जोर आला.

मग प्रवासासाठी लागणारी तयारी – कारची, स्वतःची, खाण्यापिण्याची, अडीअडचणीची, पैशाची; रस्त्यांची माहिती आणि महत्वाचं म्हणजे स्वरक्षणाची तयारीसुद्धा दोघींनी केली.
फक्त एक रात्र हॉटेलला राहण्याचा अपवाद वगळता हा संपूर्ण प्रवास त्यांनी कुणा-न-कुणाच्या घरी मुक्काम करून केला. हे सर्व लोक ओळखीतून शोधणे आणि त्या सर्वांनीपण यांना आपल्या घरी सामावून घेणे, यांची व्यवस्था करणे हाही माणुसकीचा एक अनुभवच होता.

प्रवासात त्यांनी एक वेगळा भारत पाहिला, अनुभवला आणि सर्वत्र त्यांचे कौतुकच झाले.
वेशभूषा, खाद्यजत्रा, बोलण्याची-वागण्याची वेगळी पद्धत, निसर्ग, माणसे, जमीन, जैवविविधता अशा गोष्टींचे त्यांचे निरीक्षण, अनुभवकथन आणि त्यांतला खरेपणा हे सारे मनाला भिडणारे होते. मागासलेला भारत म्हणजे भारत किती मागे आहे हे ऐकून मन उदास झाले.

या सर्व प्रवासाने त्या दोघींना स्वतःतल्या ‘स्व’ आणि ‘ती’ची छान ओळख झाली. वेगळं काहीतरी स्वतः करायची कल्पनाही साकार झाली.

या जोडगोळीच्या मनात येणाऱ्या वेगवेगळ्या कल्पना पूर्ण होवोत अशी देवाकडे मनःपूर्वक प्रार्थना.

त्यांच्या साहसाबद्दलची अजून माहिती पुढील फेसबुक लिंकवर बघू शकता...
https://www.facebook.com/409395016155039/posts/998209423940259/?sfnsn=wiwspwa&extid=TjQk8akLGq3Rooor&d=w&vh=e

कार्यक्रमाचा रेकॉर्डेड व्हिडिओ येथे पाहा.

# श्रावणरंग

ॲन अंजली देवधर




**दिनांक – १० ऑगस्ट २०२०**

सर्व जण दहा तारखेची आतुरतेने वाट पाहत होते. महिनाभर आधी या कार्यक्रमाची चाहूल लागली होती. नेहमीप्रमाणे बऱ्याच ॲन्सनी या कार्यक्रमात हिरिरीने भाग घेतला होता. कार्यक्रमाचे नाव होते 'श्रावण रंग'.

आज श्रावणी सोमवार अर्थातच कार्यक्रमाची सुरुवात झाली ॲन राधिका वाघमारे यांच्या शिवस्तुतीने. आवाजात इतका गोडवा की, साक्षात शंकरही मंत्रमुग्ध झाले असतील तिचा आवाज ऐकून! श्रावणसरी जशा बरसत असतात नाऽ तशा आमच्या ॲन्सही आपल्यात असलेल्या कलागुणांची बरसात करत होत्या. फर्स्ट लेडी सुगंधाने कार्यक्रमासाठी तयार व्हायला सांगितले आणि पडत्या फळाची आज्ञा मानून आमच्या ॲन्सनी हमभी कुछ कम नही याची प्रचिती दिली.

श्रावण महिना हा सणांचा आणि व्रतवैकल्यांचा महिना... आम्ही सर्व जणी या महिन्याची आतुरतेने वाट पाहत असतो. सणांच्या निमित्ताने बायका शालू, पैठण्या, दागदागिने घालून आपली हौसमौज पुरवून घेतात.

'श्रावण आला...' या गीतावर केलेल्या नृत्याने आमच्या ॲन्स किती हौशी आहेत ते दिसून आले.

यात भाग घेणाऱ्या हौशी ॲन्स होत्या फर्स्ट लेडी सुगंधा नातू, रो. मृदुला घोडके, ॲन अस्मिता आपटे, ॲन अंजली पाषाणकर, ॲन नंदिनी अत्रे, ॲन स्नेहा ओगले, ॲन राधिका वाघमारे, ॲन स्वाती वेलणकर, ॲन विनिता कुलकर्णी आणि ॲन मोहिनी नातू.

सर्व ॲन्स सुंदर दिसत होत्या.

श्रावण महिन्यातील सण आणि व्रतवैकल्ये यांवर कविता लिहिली ॲन अंजली देवधर यांनी आणि ती गायली त्यांची सून प्रज्ञा हिने. प्रज्ञानेही या कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने भाग घेतला आणि मधुर आवाजात कविता गायलीही!

श्रावण महिना म्हटला की कोकिळाला कंठ फुटतोच... मग आमच्या ॲन्सही त्याला अपवाद कशा ठरतील? आपल्या सुमधुर आवाजात ॲन चित्रदा प्रभुमिराशी यांनी कोकिळाला साद घातली.

निसर्गाऽ पाऊस आणि करोना यांची एकमेकांशी सकारात्मक सांगड घालून हे विश्वसंकट जाऊन सर्वांना उत्तम निरामय आरोग्य लाभू दे अशी प्रार्थना देवीजवळ केली ॲन चारूशीला पटवर्धन यांनी.

करोनाने आपल्या सर्वांना घरात बसवले असले तरी मनुष्यप्राणी हार मानणारा नाही. काहीही झाले तरी आपले कार्य तो नेटानं पुढे नेतच असतो. आजची तरुण पिढीसुद्धा त्यांच्यावर झालेले संस्कार त्यांच्या पद्धतीने जपायचा प्रयत्न करते आहे! यावर छोटी नाटिका सादर केली ॲन गौरी क्षीरसागर आणि ॲन प्रियदर्शनी अंबिके यांनी.

हसरा, नाचरा, जरासा लाजरा या गाण्यावर स्वतः गाऊन आणि नृत्याचे सादरीकरण करून गाण्याची लज्जत वाढवणाऱ्या होत्या ॲन विजया गुजराती.

या श्रावण महिन्यात उत्साही वातावरणात कवी, लेखक यांनाही लेखनाचा सूर गवसलेला असतो. कृष्णमेघ कुंटेलिखित 'एका रानवेड्याची शोधयात्रा' या पुस्तकातील ऋतुचक्र यातील काही भागांचे वाचन ॲन विशाखा वेलणकर यांनी केले आणि बघता-बघता आपल्या नजरेसमोर ते वातावरण उभे केले. खरंच! ही एक मोठी कला आहे. आम्ही सर्वांनी बाहेर न जाता या रानफेरीचा अनुभव घेतला.

ॲन कांचन बदामीकर आणि अवनी यांनी या गरजत बरसत येणाऱ्या पावसाला आव्हान देत, आपल्या पदलालित्याने 'गरजत बरसत सावन आयो रे' या गाण्यावर नृत्याचे सादरीकरण केले. ॲन माधवी देशपांडे आणि मुक्ता या मायलेकींनी श्रावणाबद्दलचे त्यांचे विचार मोठ्या खुबीने कवितेतून मांडले. ॲन संगीता देशपांडेंनी स्वतः गाऊन आणि स्वरचित नृत्य सादर करून कार्यक्रमाला बहार आणली. श्रावण महिना म्हणजे व्रतवैकल्ये आणि सणवार. नववधूंना आणि बायकांना एक पर्वणीच नाही का? उखाण्यांचा एक गंमतशीर कार्यक्रम केला ॲन ऋचा नांदुरकर हिने.


ॲन श्वेता करंदीकर हिने मेडले गाण्याचा कार्यक्रम करून कार्यक्रमाची रंगत तर वाढवलीच आणि अपर्णा कुलकर्णी हिने मेडले नृत्य सादर केले.

अशा तऱ्हेने ॲन्सच्या कलागुणांनी नटलेल्या आणि सर्वांच्या मनात ठसलेल्या 'श्रावण रंगा'ची समाप्ती झाली ती पुढल्या वर्षी परत बरसण्याकरता! रो. मृदुला घोडके यांचे ओघवते सूत्रसंचालन, प्रो. कमिटीचे चेअरमन रो. मंदार पूर्णपात्रे, ॲन नंदिनी अत्रे, रो. अभिजित देशपांडे, रो. आनंद कुलकर्णी यांनी घेतलेल्या कष्टांमुळे आणि सर्व ॲन्सनी आणि खासकरून नवीन ॲन्सनीही कार्यक्रमास उत्तम प्रतिसाद दिल्यामुळेच हा कार्यक्रम देखणा होऊ शकला अशी पावती फर्स्ट लेडी सुगंधा आणि प्रे. रो. सुदर्शन नातू यांनी दिली आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाचा रेकॉर्डेड व्हिडिओ येथे पाहा...

## *A story of research from Brain to Bedside*

**रो. मृदुला घोडके**




**वक्ते – श्रीनिवास पटवर्धन**
**दिनांक – १७ ऑगस्ट २०२०**

सोमवारी, १७ ऑगस्टच्या साप्ताहिक बैठकीसाठी प्रेसिडेंट सुदर्शन यांनी टाकलेली पोस्ट वरवरच पाहिली... पण याच सभेसाठी आयपीपी सोनल पटवर्धन यांचाही मेसेज आला... तेव्हा वाटलं... काय आहे विषय...

'A story of research from Brain to Bedside'... विद्युत अभियांत्रिकीपासून जैव-अभियांत्रिकी ते मज्जातंतूशास्त्र असा प्रवास... कुतूहल वाटलं... म्हणून या सभेला आवर्जून उपस्थित राहिले.

सोनल पटवर्धन यांनी प्रास्ताविक केलं आणि माझ्या मोबाईलच्या स्क्रीनवर अतिशय देखणा, तेजस्वी असा तरुण चेहऱ्यावर प्रसन्न हास्य घेऊन उपस्थित झाला. ते म्हणतात ना... 'मी आलो, मी पाहिलं, मी जिंकलं.' अगदी तसंच झालं.

आयपीपी सोनल आणि महेश पटवर्धन यांचा सुपुत्र श्रीनिवास पटवर्धननं जैव-अभियांत्रिकी क्षेत्रातल्या आपल्या पीएच. डी.च्या कामाबद्दल माहिती दिली. विज्ञान, अभियांत्रिकी, गणित असे शब्द पुसटसे जरी कानांवर पडले तर जिथे असेल तिथून पोबारा करणारी मी श्रीनिवासचं बोलणं सुरू झाल्यावर तिथून दीड तास हालले नाही. शरीराचा विशिष्ट भाग किंवा अवयव गमावलेल्या लोकांकरताचं कृत्रिम अवयवनिर्मितीच्या क्षेत्रातलं श्रीनिवासचं संशोधन आहे. आपल्या शरीरातल्या प्रत्येक अवयवाचा आपल्या मेंदूशी असलेला संबंध, मेंदूमध्ये असलेलं संवेदना संजाल, मेंदूतून होत असलेलं अवयवनियंत्रण असली क्लिष्ट माहिती श्रीनिवासनं अगदी सोपी, मराठमोळी, आपली वाटणारी-पटणारी अशी उदाहरणं देऊन सहजपणे सांगितली. आपल्या कामाचा अनुभव, झपाटा, त्यातलं संशोधन आणि तंत्रशास्त्रीय प्रगती यांचा परिचय श्रीनिवासनं सर्वांना करून दिला. विशेष कौतुकाची बाब म्हणजे या संशोधनाद्वारे मानवी जीवन सुधारण्याची त्याची जबरदस्त इच्छाशक्ती! त्यासाठी लागणारी संवेदनक्षमता श्रीनिवासच्या शब्दाशब्दांतून व्यक्त होत होती. नियतीच्या लहरीमुळे आपले अवयव गमावलेले, निराश झालेले लोक आपल्या जीवनात अशा कृत्रिम अवयवांचा वापर सहजतेनं करू शकण्याकरता ते परवडणाऱ्या किमतीला उपलब्ध होऊन सामान्य माणसाच्या आवाक्यात यावेत यासाठी श्रीनिवास प्रयत्नशील आहे.

त्याच्या या प्रयत्नांना, संशोधनाला आमच्या अनेक शुभेच्छा!

## काका सावंत - श्रद्धांजली

**दिनांक - २४ ऑगस्ट २०२०**

आपल्या सर्वांचे प्रिय पी. पी. काका सावंत यांचे याच दिवशी आकस्मिक निधन झाले. काकांना श्रद्धांजली वाहून ही मिटिंग संपली. या दिवशीचा पूर्वनियोजित कार्यक्रम रद्द करण्यात आला.

## संगीत, गप्पा आणि बरंच काही

Rtn Sharad Dole, President,
RCP Shivajinagar

**Program Presenter (Host) - Gargi Purnapatre**
**In conversation with - Rucha Bondre and Tanmay Pawar**
**Date - 29 - August 2020**

RCP Shivajinagar (our club) had a joint meeting with RCP South and RCP Lakshmi Road. The program was '**संगीत, गप्पा आणि बरंच काही**' It was a novel concept to understand the passion of two highly qualified professionals Rucha Bondre and Tanmay Pawar (Engineer / MBA), towards music. Their passion resulted in a successful career in the field of music. Rucha's training as a trained classical singer compliments Tanmay's passion.

The musical journey of Tanmay and Rucha was nicely unraveled by equally qualified professional Gargi Purnapatre. She is a school and a college-mate of Rucha and is currently based in Germany. Gargi's style of conversation put Rucha and Tanmay at ease in front of seniors.

Rucha works at Atlas Copco, Pune, and balances her profession and passion.



Tanmay left a highly sought after career in a company like Tata Motors for pursuing his passion for music. Tanmay is a guitarist and is part of आविष्कार band. Gargi Purnapatre is a trained classical dancer and is the daughter of Rtn. Mandar Purnapatre. Conversation with Rucha and Tanmay was complemented by light classical music recitals by Rucha and guitar performance by Tanmay. Gargi also requested Rucha and Tanmay to share the story of their marriage. She also asked them to share their experiences about challenges faced by them while balancing their individual musical interests and sensitivities.

At the end of the program, a musical video of 'सुनरी सखी' was played. The music compositions and lyrics were done by Tanmay and Rucha.

Those who could not attend the meeting can view this music video on YouTube at https://youtu.be/V_A0co3C5Ds

It was a treat to watch professionally produced and directed musical video 'सुनरी सखी'. RCPS wishes Gargi, Rucha, and Tanmay success in pursuing their respective passions in classical dance and music.

कार्यक्रमाचा रेकॉर्डेड व्हिडिओ येथे पाहा...

➢ क्लबच्या साप्ताहिक सभांचा सभेनुसार गोषवारा

साप्ताहिक सभा

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
एके / यामिनी पोंक्षे

# कोविड योद्ध्यांचा सन्मान

रो. उद्धव गोडबोले

कोविडविरुद्धची आपली लढाई जारी आहे. अनेक व्यक्ती त्यात धाडसाने भाग घेऊन मोलाची समाजसेवा करत आहेत. मागील महिन्याप्रमाणेच ऑगस्ट महिन्यातही आपल्या क्लबने व्होकेशनल सर्व्हिस, फंक्शनल लिटरसी अँड स्किल डेव्हलपमेंट कमिटीतर्फे अशा काही व्यक्तींना एक मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्याचे ठरवले. अभिमानाची बाब म्हणजे आपल्याच क्लबचे अनेक सभासद या लढाईत मोलाचे कार्य करत आहेत.

त्याचबरोबर आपले सभासद नसलेल्या व्यक्तींचाही त्यात समावेश आहे.

















दुसऱ्या टप्प्यात प्रेसिडेंट रो. सुदर्शन नातू यांच्या हस्ते खालील व्यक्तींचा गौरव करण्यात आला:-
या वेळी सूचक रो. नितीन पाठक उपस्थित होते.

१. श्री. सुधीर जवळीकर ( रा. स्व. संघ कार्यकर्ते)
२. श्री. शेखर धुमाळ (रा. स्व. संघ कार्यकर्ते)
३. ॲड सायली साधले
४. सौ. प्रतिभा जोशी(वरिष्ठ पो. नि. कोथरूड पोलिस ठाणे)
५. श्री. देवकर (पो. नि. वेल्हा)
६. श्री. शिवाजी शिंद,(तहसिलदार, वेल्हा)
७. श्री. कानडे
८. श्री. अजय गोटखिंडीकर व सहकारी (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती), सूचक -रो. निरंजन
९. डॉ. संजय साळुंखे

याशिवाय खालील व्यक्तींचा गौरव करण्यात येणार आहे:
आपले सभासद
१. रो. संजीव ओगले
२. रो. मृदुला घोडके
३. ॲन विशाखा वेलणकर
सभासदांनी सुचवलेली नावे:
१. रो. चित्रसेन दिवाकर खिलारे- एरंडवणे, सूचक- रो.पी.पी. सोनल पटवर्धन
२. सर्वश्री सचिन देवधर व आनंद इंगळे, सूचक -रो. निरंजन
३. श्री. मंगेश गुप्ते, सूचक - रो. अरविंद शिराळकर
४. डॉ. भास्कर हर्षे, सूचक - रो. अरविंद शिराळकर
५. श्री. रुत्विज गोखले, सूचक - रो. पी. पी. गोविंदराव पटवर्धन
६. सारंग आनंद सराफ, सूचक -रो. दत्ता पाषाणकर
७. श्री. संतोष दतात्रेय फडतरे, सूचक -रो. दत्ता पाषाणकर
८. सर्वश्री दीपा व दिलीप परब, सूचक - डॉ. गीतांजली पुरोहित

## प्लाझ्मादान जनजागृती मोहीम

**रो. श्वेता करंदीकर**







प्लाझ्मादान जनजागृती मोहिमेअंतर्गत आपल्या क्लबने शहरातील काही प्रमुख ठिकाणी या मोहिमेची माहिती देणारे बॅनर लावले आहेत. यांपैकी मंडई गणपती येथील बॅनर रो. डॉ. मंदार अंबिके यांच्या पुढाकाराने तर दुसरा बॅनर रो. दत्ता पाषाणकर यांच्या बिल्डिंगवर लावला आहे. यासाठी त्यांनी आणि रो. सुभाष चौथाई यांनी खूप परिश्रम घेतले. नंतर तिथल्याच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांसाठी रोटरीचे मास्क वाटप केले गेले.

रो. डॉ. मंदार अंबिके, रो. दत्ता पाषाणकर, रो. सुभाष चौथाई, रो. भाऊ सहस्रबुद्धे आणि आय.पी. पी. रो. अभिजित जोग यांना धन्यवाद!

अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष आण्णा थोरात आणि नगरसेवक सम्राट थोरात यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उदघाटन झाले.

## लॉकडाऊनमधील मनोरंजन- सुडोकू स्पर्धा

**रो. हृषीकेश बडवे, स्पोर्ट्स कमिटी**

आरसीपीएसच्या स्पोर्ट्स कमिटीतर्फे ऑनलाईन पद्धतीने सुडोकू स्पर्धा नुकतीच घेण्यात आली. यामध्ये क्लबमधील दहापेक्षा जास्त रोटेरिअन्स आणि ॲन यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. रोटरी वर्ष २०२०-२१मधील स्पोर्टस् कमिटीचा पहिलाच कार्यक्रम यावेळी लोकडाऊनच्या बंधनांमुळे ऑनलाईन केला गेला.

ठरलेल्या वेळेत सुडोकू सोडवून आयोजकांना पाठवण्यास स्पर्धांकांना सांगितले गेले. याप्रमाणे कमीत कमी वेळेत अचूक कोडे सोडवणारी व्यक्ती त्या दिवशीची विजेती ठरली. स्पर्धेतील चुरस आणि लोकप्रियता इतकी वाढली की, स्पर्धेचा कालावधी एक

आठवड्याऐवजी दोन आठवडे करण्यात आला.


एकाच दिवशी दोन अवघड कोडी सोडवण्याची अंतिम फेरी रविवार २३ ऑगस्ट रोजी घेण्यात आली.

जास्तीत जास्त अचूक उत्तरे, कमीत कमी वेळ आणि अंतिम फेरीतला सहभाग या निकषांवर पुढीलप्रमाणे विजेते घोषित करण्यात आले.

**प्रथम क्रमांक** – ॲन मोहिनी नातू
**द्वितीय क्रमांक** – रो. डॉ. राजेंद्र गोसावी
**उत्तेजनार्थ पारितोषिके** – रो. रवींद्र प्रभुणे, ॲन अस्मिता आपटे, ॲन संगीता देशपांडे

## रोटरी इंटरॅक्ट

**रो. अभिजित देशपांडे**



मित्रांनो,

तीन नवीन इंटरॅक्ट क्लब्जचे इंस्टॉलेशन करून कामाचा धडाका उडवून दिलेल्या आपल्या इंटरॅक्ट कमिटीने या महिन्यातदेखील चौथ्या इंटरॅक्ट क्लबचे व्हर्च्युअल इंस्टॉलेशन श्री सरस्वती विद्यालय, आंबवणे या शाळेमध्ये पार पाडले. १५ ऑगस्ट २०२० रोजी म्हणजेच भारताच्या चौर्याहत्तराव्या स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी अत्यंत उत्साहात हा कार्यक्रम झाला.

प्रचंड पाऊस असल्याने इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि फोन दोन्ही बंद असतानादेखील खूप मेहनत घेऊन, विद्यार्थ्यांशी आणि शिक्षकांशी कायम संपर्कात राहून इंटरॅक्ट कमिटी चेअरपर्सन रो. माधुरी किरपेकर यांनी या कार्यक्रमाचे उत्तम संयोजन केले.

क्लब प्रे. रो. सुदर्शन नातू, यूथ सर्व्हिसेस डायरेक्टर रो. रश्मी परुळकर, ॲन अस्मिता आपटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इंटरॅक्ट कमिटी सदस्य आणि क्लबचे आय. टी. ऑफिसर रो. अभिजित देशपांडे यांनी व्हर्च्युअल कार्यक्रमाची तांत्रिक बाजू उत्तमरीत्या सांभाळली.

शाळेतल्या पाठक मॅडम तसेच विद्यार्थी–विद्यार्थिनी झूमद्वारे या कार्यक्रमात सहभागी झाले होते. तसेच फर्स्ट लेडी ॲन सुगंध नातू, सेक्रेटरी रो. मनीषा बेळगावकर, पी पी रो. डॉ. किरण पुरोहित, रो. दत्ताजी देवधर, रो.किरण वेलणकर, रो. सुभाष चौथाई, रो. विनायक जोशी, ॲन जयश्रीताई बेंद्रे, ॲन स्वाती वेलणकर, ॲन डॉ. विजया गुजराथी आणि इतर अनेक सदस्य उपस्थित होते.

कामाचा आलेख असाच चढता ठेवण्याकरता आमच्या इंटरॅक्ट क्लबच्या टीमला अनेक शुभेच्छा!

## दक्षिणकरांची साजरी सजावट

आपल्या मेंबर्सनी घरच्या गणपतींची आणि गौरींची केलेली सुंदर सजावट सगळ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी या वेळेस बुलेटीन कमिटीतर्फे 'दक्षिणकरांची साजरी सजावट' ही स्पर्धा घेण्यात आली. मेंबर्सनी आपल्या घरच्या गणपती आणि गौरीच्या सजावटींचे फोटो पाठवले. सगळ्याच सजावटी मनमोहक आहेत. विविध अंगांचा विचार करून जज्जेसनी दिलेला निकाल पुढीलप्रमाणे...

**प्रथम क्रमांक**



**रो. मीनल माळवदकर**

**द्वितीय क्रमांक**



**ॲन अस्मिता आपटे**

**तृतीय क्रमांक**



**रो. जितेंद्र महाजन**

**उत्तेजनार्थ बक्षीसे**



**ॲन इंद्रायणी पूर्णपात्रे**



**ॲन डॉ. गीतांजली पुरोहित**

स्पर्धेत भाग घेतलेल्या इतर स्पर्धकांची सजावट येथे पाहा...

# आनंददायी वृक्षारोपण– ऑगस्ट २०२०

रो. रवींद्र प्रभुणे










या वर्षी अनपेक्षितपणे आलेल्या बंधनांमुळे जनजीवनाची घडी अनेक ठिकाणी विसकटलेली असतानादेखील रोटरी क्लब पुणे साऊथमधील सभासदांचा उत्साह आणि कामांची रेलचेल उणावली नव्हती. याचे प्रत्यंतर आपल्या क्लबच्या एन्व्हायरमेंट कमिटीच्या कार्यक्रमांतही दिसून येते.

नेहमीच्या प्रथेप्रमाणे रोटरीचे नवीन वर्ष सुरू होताच जुलै महिन्यामध्ये बीजारोपण आणि वृक्षारोपण हे कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाले.

ऑगस्ट महिन्यामध्ये वृक्षारोपणाचे तीन कार्यक्रम साजरे झाले. तीनही कार्यक्रमांना स्वतःचे असे वैशिष्ट्य होते.

१) **वृक्षारोपण – चांबळी**
**५ ऑगस्ट २०२०**

हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम दृष्ट लागण्यासारखा झाला. ज्यांचा चुकला ते एका आनंदाला मुकले.

पाणी पंचायतीतर्फे उत्तम नियोजन, पूर्व तयारी, त्यांचे कार्यकर्ते, चांबळीच्या सरपंचांचे सर्व कुटुंबीय आणि ग्रामस्थांचा सहभाग यामुळे कार्यक्रम सफल झाला.

आपल्या क्लबच्या सदस्यांचा उत्साह आणि सहभाग वाखाणण्याजोगा होता, विशेषत: दत्ताजी देवधर आणि नवीन सदस्य.

या दिवशी चारशे झाडे लावण्यात आली.

**२) वृक्षारोपण – कर्नलवाडी**

पुण्यापासून साधारण साठ किलोमीटरवर साधारण दुष्काळी समजलेल्या नीरा गावाजवळील एका ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये रस्त्याच्या कडेने झाडे लावण्याविषयी काही दिवसांपासून आपली बोलणी चालू होती. त्याला गावच्या अत्यंत सुशिक्षित सरपंचांकडून खूप सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि ग्रामस्थांच्या भरघोस सहभागामधून रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करण्यात आले.

‘आम्ही सगळी कामे करतो, तुम्ही आम्हाला मार्गदर्शन करा आणि चांगली रोपे पुरवा’ अशी मागणी त्यांनी केली. त्याबरहुकूम आपण त्यांना रस्त्याच्या कडेला लावण्यायोग्य अशी दोनशे रोपे पुरवली. त्यांसाठी खड्डे खणणे, झाडे लावणे आणि संरक्षणासाठी पिंजरे बसवणे ही सर्व कामे ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने केली. रोटरीसारखी संस्था ‘तुम्ही झाडे लावा. आम्ही तुम्हाला हवी ती मदत करू’ असा प्रस्ताव घेऊन आपणहून येते आहे याचे त्यांना खूपच अप्रूप वाटले.

त्यांनी याचे नम्रपणे स्वागत केले. त्याबरोबरच एक एकर जागेवर देवराई करण्याच्या आपल्या प्रस्तावास त्यांनी आनंदाने संमती दिली आणि त्या दृष्टीने एक एकर जागा राखीव करून सपाटीकरण करणे, कुंपण घालणे, पाण्याची व्यवस्था करणे ही कामे त्यांनी हाती घेतली असून तिथेही देवराईसाठीची लागवड होणार आहे.

त्यांचा हा सकारात्मक दृष्टिकोन बघून पूर्वाध्यक्ष डॉक्टर गोरे सर यांनी त्यांचे कौतुक करणारे एक पत्र त्यांना पाठवले.

त्याविषयीही  कृतज्ञता व्यक्त करून रोटरीचे असेच मार्गदर्शन वारंवार मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

स्थानिकांकडून मिळालेल्या भरघोस प्रतिसाद याचे हे उत्तम उदाहरण आहे.

**३) चांबळी वृक्षारोपण – २**

**२३ ऑगस्ट २०२०**

या ठिकाणी अजूनही खूप झाडे लावण्यास वाव आहे आणि परिस्थिती पोषक असल्यामुळे तिथे जमेल तितकी झाडे लावण्याचा आपला मानस आहे... त्यामुळे दुसरा टप्पा सोळा ऑगस्ट रोजी करण्याचे ठरले होते परंतु काही अडचणींमुळे त्याला पुढच्या रविवारचा म्हणजे तेवीस तारखेचा मुहूर्त लागला. त्याही दिवशी अनेक जणांची गैरसोय  झालेली असतानादेखील लक्षणीय उपस्थिती होती.

गोरे सरांकडचे तीन पाहुणे, नितीन पाठक यांच्याकडचे दोन पाहुणे (यामधील एक जण नवीन सभासद होऊ इच्छित आहे), रो.नितीन कुर्ले यांच्याबरोबर आलेले अजून तिघे जण, या वर्षीचे प्रेसिडेंट(सुदर्शन) आणि फर्स्ट लेडी (सुगंधा), आयपीपी अभिजित, माजी  प्रेसिडेंट्स (डॉ. गोरे सर, विनायकराव) आणि दोन भावी प्रेसिडेंट्स (अतुल, ओगले आणि कुटुंबीय)  यांची उपस्थिती होती... त्यामुळे पुढची दोन्ही वर्षे प्रकल्प चालू राहणार याची खात्री झाली.

पाणी पंचायतीचा सहभाग नेहमीसारखा होताच... शिवाय त्याबरोबर एक विशेष बाब म्हणजे ग्रामस्थांपैकी अनेक तरुण (भावी कार्यकर्ते), बाल कार्यकर्ते असे अनेक जण उत्साहाने सहभागी झाले होते.

उत्तम पूर्वतयारी असल्यामुळे आज सहाशे झाडांचे वृक्षारोपण अतिशय कमी वेळात झाले. खड्डे आहेत, वृक्षारोपण करण्यासाठी माणसे आहेत पण झाडे कमी पडली अशी आजची परिस्थिती झाली होती.

तासाभरात वृक्षारोपण झाल्यामुळे त्यानंतर मिळालेल्या सुग्रास भोजनाचा आस्वाद आल्हाददायक वातावरणात प्रत्येकाने घेतला.

वृक्षारोपणाबरोबरच याला एका आनंददायी सहलीचे स्वरूप आल्याचे अनेक जणांनी बोलून दाखवले.

यादरम्यान अजून एक विशेष बाब लक्षात आली. विशी-तिशीतले जे ग्रामीण युवक आज सहभागी झाले होते त्यांना वृक्षारोपणाचे महत्त्व आणि त्यांची जबाबदारी यांची जाणीव झाल्याचे जाणवले. हे काम आपल्याला पुढे न्यायचे आहे हा संदेश त्यांच्यापर्यंत योग्य रितीने पोहोचला आहे.

या तीनही कार्यक्रमांचे श्रेय श्री. रघुनाथ ढोले, पाणी पंचायतीच्या डॉक्टर सोनल शिंदे मॅडम,  प्रशांत बोरावके, त्यांची टीम, चांबळीची युवा टीम, सरपंच, कर्नलवाडीचे सरपंच श्री. सुधीर निगडे, परिचित श्री. कल्याण निगडे (ज्यांनी हा योग घडवून आणला), कर्नलवाडीचे ग्रामस्थ, डॉक्टर गोरे सर, नितीन पाठक आणि  उपस्थित असलेले सर्व ॲन्स-रोटेरिअन्स, पाहुणेमंडळी यांना जाते.

याची पूर्वतयारी आणि जुळवाजुळव करण्यात आपले उत्साही रोटेरिअन श्री. नितीन पाठक, डॉक्टर गोरे सर आणि कायम बरोबर असणारे आपले अध्यक्ष सुदर्शन नातू यांच्याशिवाय हा प्रकल्प तडीस गेलाच नसता.

एक  संस्मरणीय कार्यक्रम म्हणून याची नक्की नोंद होईल.


- **अध्यक्ष सुदर्शन संवाद**
- **विविध विभाग संचालक किंवा कमिटी मुख्य संवाद**
- **क्लबमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम, फेलोशिप्स**
- **जावे त्यांच्या क्षेत्रा.../ मागील एखाद्या प्रोजेक्टची गोष्ट**

**तुमचा लेख आवर्जून द्या....**
**समन्वयक**
**आनंद / यामिनी**

**क्लबकारी**

मी कोण अन् आले कुठून, काहीच नाही स्मरणी
ओळखीची वाटतात, फुले ताऱ्यांची गाणी!

तोच दिवा अंतराळीचा, दिनरातीचा खेळ
कक्षेमधुनी भ्रमण ग्रहांचे, नाना ऋतूंचा मेळ!

आकाशाची निळाई आठवे, नक्षत्रांची रांगोळी
चंद्राकडे तशाच धावती, जललहरींच्या ओळी!

दर्याची स्मरते गाज, आठवे नदीची ओढ
हिरव्या पान्ह्यातून आठवे, माया भुईची गोड!

स्मरती मात्र चरणद्वय ते, जिथे टेकला माथा
बोध जाणवे अंतरात, जो वाट दाखवी चित्ता!

जन्मांतरीच्या संस्कारातुनी, धावे जीवननदी
या थेंबाचा सागर स्वामी, एकच आदी अन् अंती!

– ॲन मोहिनी नातू

**कवितेचा ऑडिओ येथे ऐका**

मोहिनीजी,

आपली कविता वाचून खूप आनंद झाला. अगदी सुरेख आहे ही कविता. मनाला एकदम भावली. ही रचना म्हणजे 'वाचे बरवे कवित्व। कवित्वी रसिकत्व। रसिकत्वी परतत्त्व। स्पर्शु जैसा।।'चे एक चांगले उदाहरण म्हणता येईल. अत्यंत थोड्या शब्दांत गहन–गंभीर विषय आपण सहज आणि हळुवारपणे मांडला आहे. जीवनविषयक व्यापक तत्त्वज्ञान, त्याचा शोध आणि बोध कवितेत सामावला आहे. ही कविता आपल्या अंतरीच्या ऊर्मींच्या उमाळ्याची आहे, तशीच भाषाप्रभुत्वाची साक्षी आहे. या शब्दवैभवाला एका सखोल वैचारिक बैठकीचे अधिष्ठान लाभले आहे. आपण जरी ही कविता सलग मांडली असली तरी मला ती चार–चार ओळींच्या तीन सुंदर कडव्यांची वाटली.

'कोऽहम्' हा सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न आपल्या मनात कायम असतो. आपल्या मूळ स्वरूपाची, ज्ञानाईच्या भाषेतली 'स्वधर्मा'ची ओळख आपल्याला नसते... पण ज्याच्याशी आपला मूळ अनुबंध निगडित असतो. त्याच्या काही पाऊलखुणा आपल्या तीव्र संवदनशील आणि ईश्वरप्रवृत्त मनाला आपल्या भोवतालात, निसर्गात दिसत असतात... त्यामुळेच ही फुले, ते तारे आणि त्यात लपलेले अनाहत नादाचे गाणे आपल्याला खुणावत असते. कुठेतरी आपली खरी 'ओळख' पटत असते. हे आपण फार सुंदर शब्दांत मांडले आहे. आपल्या आतल्या शक्तीशी त्या वैश्विक महाशक्तीचा असलेला संबंध आपण पहिल्या कडव्यातल्या चार ओळींत संकेताने पण निश्चितपणे प्रस्तुत केला आहे. त्यात सत्यम् शिवम् सुन्दरम् यांचा संमिलाप आहे... तसे विशाल व्यापकतेचे आणि विविधतेचे चित्रणही आहे.

दुसऱ्या कडव्यातली आकाशाची निळाई, नक्षत्रांच्या रांगोळीतली धवलता, वात्सल्यरूप मायभूचा हिरवा पान्हा या पदबंधातून जसे कवित्व फुललेले दिसते तसा त्यातून मानवाचा निसर्गाशी, या पंचमहाभूतांशी असलेला लागाबांधाही व्यक्त होतो. चराचरांत भरून राहिलेल्या या व्यापक तत्त्वाशी असलेली आपली जवळीक स्पष्ट होते. रंग आपल्याला केवळ नयनसुख देत नाहीत तर त्यांतून त्यांच्या तत्त्वगुणांचे दर्शनही आपल्याला होत असते. इथे आकाश, रांगोळी, भूमीचा पान्हा यांतून निळ्या, पांढर्‍याय, हिरव्या रंगांचा आणि त्यांतल्या नितळतेचा, शांतीचा आणि सर्जनाचा मार्मिक संकेत मिळतो. या कडव्यातल्या चार ओळींतून पृथ्वी, जल, तेज, वायू, आकाश या पंचमहाभूतांचे दर्शन होतेच... शिवाय जललहरींतून गतीचा, शीतल तेजाच्या आकर्षणाचा आणि ओढीचा, दर्याच्या गाजेतून अनाहत नादाचा, भूमीतील ममत्वाचा प्रत्यय येतो. याच पंचतत्त्वांच्या माध्यमांतून आत्मा-परमात्म्याचा परस्परसंबंध स्पष्ट होत जातो. हे कडवे अत्यंत काव्यात्मक आणि सारग्राही ठरते ते त्यामुळे.

तिसऱ्या कडव्यातल्या पहिल्या दोन ओळी गुरूगीतेची प्रकर्षाने आठवण करून देतात. गुरूचरणांचे महत्त्व, गुरूंप्रति असलेले समर्पण, त्यांनी ज्ञानबोधाधारे केलेले जागरण आणि त्यांतून दिसणारी वाट हा सारा प्रवास येथे या दोन ओळींत भरून राहिलेला दिसतो. त्यांतून जिवाशिवाची जवळीक, कर्मबंधातून जिवाने साठवलेले सुकृत आणि जिवशिवाची एकरूपता यांची सुंदर अभिव्यक्ती शेवटी दिसून येते. आदिअंतीमध्ये ते एकमेव, अखंड, अविनाशी तत्त्व आणि त्याच्याशी मिलन अर्थात अनन्यतेची आणि एकरूपतेची भावना दिसते. सर्व ब्रह्मांडाचा चालक, तो स्वामी, परब्रह्म आणि हा जीव यांच्यात असलेला अंशअंशी भाव आणि त्यांचे एकमेकांत सामावून जाणे शेवटच्या दोन ओळींत खूप मार्मिकतेने व्यक्त झाले आहे. कबीर म्हणतो, 'बूँद समाणी समद में सो कत हेरी जाय।' बिंदू सागरात जाऊन मिसळला, आत्मतत्त्व परमतत्त्वात मिसळले. आता द्वैत राहिलेच नाही, सारे एकरूप झाले. आपण याचे सुरेख चित्रण केले आहे. अरूपाला रूप देणे सोपे कामं नाही... ते इथे साधले आहे. या गोष्टीला मोजमाप नाही यातच त्याचे यश सामावलेले.

लाली मेरे लाल की,
जित देखौं उत हो गयी लाल।
लाली देखन मैं गयी,
मैं भी हो गयी लाल।।
म्या पामरे काय लिहावे, प्रतिभेला दंडवत!

– सदानंद महाजन

## तिचं काय चुकलं...

ॲन अस्मिता आपटे

कालच माझ्या दोन्ही भावांनी सांगून टाकलं... आईला वृद्धाश्रमात ठेवायचं... पण हा त्यांचा निर्णय मला पटत नव्हता. माझ्या मनाची तयारी होत नव्हती. मी माझ्या दोघा भावांच्या निर्णयावर जवळजवळ सहा महिने विचार करत राहिले... पण माझा निर्णय होत नव्हता. एकोणनव्वद वर्षांची माझी आई माझ्याजवळच राहते. तिला माझ्याकडे राहायला आवडतं. मला दोन भाऊ, भावजया, भाचे, सगळे जण आहेत... पण  घरोघरी मातीच्या चुली! असो.

रात्रीचे जेवण उरकून निवांत पुस्तक वाचत पडले होते. तेवढ्यात काहीतरी पडल्याचा आवाज आला आणि पाठोपाठ पाणी वाहत असल्याचा आवाज आला. आवाजाच्या दिशेनी जाऊन पाहिलं तर काय... समोरचं दृश्य बघून मी अवाकच झाले. माझी आई बेसीनजवळ पडली होती आणि बेसीनच्या नळाचा पाईप तूटून पाणी जोरात वाहत होतं. घरात वावरतानाही वॉकरचा वापर कर असं अनेक वेळा सांगूनही आईनी ऐकलं नव्हतं. तोल जाऊन पडल्यामुळे डोक्याला लागलं होतं... शिवाय नळ तुटल्यामुळे पाणी वाहत होतं. कसंबसं आईला हाताला धरून उभं करायाचा प्रयत्न केला आणि अगदी ओढतओढत खोलीत आणलं. जखम स्वच्छ करून, कपडे बदलून तिला झोपायला सांगितलं... तोपर्यंत तिकडे घरात सर्वत्र पाणीच पाणी... उंबरठा कुठेच नाही... त्यामुळे घरभर पाणी पसरलं. उंबरठा आणि त्याची गरज पहिल्यांदा जाणवली. पाईपमध्ये कसाबसा कपडा खोचला. पाणी काढून टाकून पुसायला सुरुवात केली. हा उपद्व्याप तासभर चालला. तेवढ्यात पाईपमध्ये कोंबलेला कपडा बाहेर येऊन परत पाणी वाहायला सुरुवात. डोक्याला हात लावून खुर्चीत बसले. रात्रीची वेळ... मी आणि आई दोघीच घरात आणि भरीत भर म्हणजे लॉकडाऊन! आता या वेळेस कोण येणार

मदतीला... आता काय... परत एकदा पाईपमध्ये कपडा घट्ट बसवला. आता मात्र माझा हा प्रयत्न सफल झाला. आधीच दुखणारी कंबर आणखी दुखू लागली. उद्या सकाळपर्यंत काहीच करता येणार नव्हतं. तेवढ्यात लाईट गेले. स्वस्थ बसून राहण्याशिवाय काहीच पर्याय नव्हता.

सकाळी लवकर उठून शेजाऱ्यांची मदत घेतली. त्यांच्या ओळखीचा माणूस येऊन काम करून गेला. आता मात्र माझ्या डोक्यात वृद्धाश्रम हा विषय घोळू लागला. माझ्या तब्येतीच्या तक्रारी आणि आईचे म्हातारपण यांचा मेळ काही जमत नव्हता. मदतीला कोणी नसताना सर्व काम करून आईची शुश्रूषा करणं मला कठीण वाटायला लागलं. दोघं भाऊ भेटायला आले आणि माझ्यावरच डाफरले 'अगंऽ आता तरी आमचं ऐक. आपण आईला वृद्धाश्रमात ठेवू या. मला खरंच खूप वाईट वाटलं. दोघांपैकी एकाच्याही मनात तिला त्यांच्या घरी न्यावं असं का नाही वाटलं? आईविषयी प्रेम, काहीच कसं नाही. जाऊ दे. तरीही आठ दिवस विचार करण्यात घालवले... पण मलाही आता झेपत नव्हतं. भावनेला आवर घालून घरापासून जवळच असलेला वृद्धाश्रम पाहून आले. चौकशीअंती ठीक वाटला आणि माझा निर्णय झाला की, आईला तिथे ठेवायचं. आधीच माझी कमी असलेली झोप आता पूर्णपणे उडाली. तिथे आईला पाठवायचं म्हणजे तिथे जायची तयारी करायला हवी. सरकन काटा आला अंगावर. जन्मदात्या आईला असं सोडून द्यायचं... का? तर आपल्याला झेपत नाही म्हणून. इकडे आईची नजर चुकवत होते. काय सांगू तिला? जमेल का मला तिला सांगायला? विचारांचं काहूर माजलं. मन अधिकच अस्वस्थ झालं. मनावर दगड ठेवून वागणं याचा अर्थ आज मला कळला. कपड्यांच्या घड्या करताना हात थरथरत होते. तिची नेहमीची औषधं सगळी नीट एका ठिकाणी भरली. सगळी औषधं आहेत नाऽ हे परतपरत बघत होते. डोकं खूपच दुखत होतं. काही सुचत नव्हतं. परत गाडी तिथेच अडकत होती की, आईला कसं सांगायचं. आईनी तेवढ्यात विचारलं 'अगंऽ कसली तयारी? कुठे जायचे?' मी काहीच बोलले नाही. तिच्या नजरेला नजर द्यायला धीरच होत नव्हता. शेवटी डॉक्टरांकडे जायचंय असं सांगून वेळ मारून नेली.

कपड्यांची पिशवी भरून झाली. दुपारी भाऊ आला. दोघांनी मिळून तिला गाडीत बसवलं. माझे हातपाय थरथरू लागले. कसंबसं स्वतःला सावरलं. वृद्धाश्रमाची पायरी चढताना पाय खूप जड झाले... पण आता मागे फिरून चालणार नव्हतं. आईला सांगितलं 'इथे नवीन डॉक्टर आहेत. त्या तुझ्यावर उपचार करणार आहेत... म्हणून तुला थोडे दिवस इथे राहावे लागणार आहे.'

बस... एका दमात सांगून बाजूला झाले... पण माझ्या आईची नजर सांगत होती की, तिला आपण कोठे आलो आहे हे लक्षात आलंय. आई मात्र अगदी गप्प होती. तेथील सेविकेने आईला आत नेऊन तिची खोली दाखवली.

आश्रमाच्या सगळ्या फॉरमॅलिटीज् पूर्ण केल्या... म्हणजे फॉर्म भरणं, पैसे भरणं, आईच्या औषधांच्या वेळा तिच्या थोड्या आवडीनिवडी वगैरे. जड अंतःकरणानं उद्या नक्की भेटायला येते असं आईला सांगून तिथून काढता पाय घेतला. घरी आल्यावर मात्र माझं सगळं अवसान गळून पडलं. अक्षरशः ढसाढसा रडले. मी आईला वृद्धाश्रमात ठेवलं ही मी मोठी चूक केली आहे असं वारंवार मनात येत होतं. एक म्हणजे लॉकडाऊनच्या काळात मदतनीस बाई ठेवायला कोरोनाच्या भीतीमुळे अवघड वाटलं आणि दुसर म्हणजे माझी तब्येत. मी पूर्णपणे मोडून गेले.

तिचं काय चुकलं? मूलबाळ, सुखवस्तू घर असताना असं अनाथ असल्यासारखं तिनं का राहायचं? हा प्रश्न मला सतत भेडसावतोय. उद्या माझं मला होईनासं झालं की माझ काय... कारण माझी मुलगी अमेरिकेत असते... म्हणजे एकतर भारत सोडून अमेरिकेत जायचं किंवा स्वतःहून वृद्धाश्रमाची पायरी चढायची...

## दशावतार आणि उत्क्रांती (भाग१)

**रो. सुभाष देशपांडे**

मी जेव्हा दशावतारांबद्दल विचार करत होतो तेव्हा माझ्या लक्षात आले की, पृथ्वीवरच्या जिवांच्या उत्क्रांतीशी दशावताराचा फार जवळचा संबंध आहे. माझ्या या आशंकेपोटी चौकशी अथवा अभ्यास करता असेही लक्षात आले की, या विचारांची मीच एकटीच व्यक्ती नसून फार पूर्वीपासून ही आशंका बऱ्याच जणांना आलेली आहे. सर्वप्रथम हेलन ब्लॉव्हॅटस्की यांनी सन १९८७ साली ही कल्पना मांडली. त्यांच्या मते डार्विनने मांडलेल्या उत्क्रांतिवादाच्या नियमांशी सुसंगत अशी दशावतारांची मांडणी आहे. जीवनाच्या सर्वात खालच्या स्तरावरून क्रमशः वरच्या स्तरांपर्यंत दशावतारांची मांडणी आहे. ही कल्पना अरबिंदोंनीपण निराळ्या रितीने मांडली होती. सर मोनिअर मोनिअर विल्यम्स यांनी असे प्रतिपादन केले की, डार्विनच्या कित्येक शतके अगोदर हिंदू पंडितांना उत्क्रांतीची माहिती आणि कल्पना होती. नबीन चंद्रसेन आणि सी. डी. देशमुखसुद्धा याच विचारांचे होते. काही वैष्णवपंथी लोकांना हे मान्य नव्हते... कारण

त्यामुळे श्रीराम हे श्रीकृष्णांच्या खालच्या स्तरावर मानले जात होते.

हे तत्त्वज्ञान अधिक समजून घेण्याकरता प्रथम आपण उत्क्रांतिवादासंबंधी आणि दशावतरांसंबंधी अधिक माहिती घेऊ.

पृथ्वी पूर्वी तप्त गोळा होती. तीनशे वीस ते तीनशे ऐंशी कोटी वर्षांपूर्वी ती थंड होऊ लागली आणि तिचे वरचे (बाह्य) आवरण घट्ट होऊ लागले. आतल्या गरम भागांतून बाहेर पडणाऱ्या वायूंमध्ये वाफ होती. जसजसे वायू वर गेले तसतसे ते थंड होऊन त्यांचे ढगांत रूपांतर झाले आणि पृथ्वी संपूर्णपणे ढगांनी झाकली गेली. शेकडो वर्षं पृथ्वीवर सतत पाऊस पडत होता. या पाण्यामुळे महासागर तयार झाले. ढगांतून होणाऱ्या विजेच्या वर्षावाने वातावरणात आणि महासागरात प्रक्रिया होऊन प्रथम रेणू (अणू) अथवा मॉलिक्युल्स (अॅटम) तयार झाले. वाहणाऱ्या पाण्याने जमिनीवरील रेणू (अणू) पाण्यात वाहून गेल्यामुळे त्यापासून प्रथम जीवनाचा साचा तयार झाला हे साधारणपणे तीनशे ऐंशी ते अडीचशे कोटी वर्षांपूर्वी झाले. साधारण साडेतीनशे कोटी वर्षांपूर्वी एकपेशीय जीव तयार झाले. अशा रितीने जीवन समुद्रामध्ये प्रथम तयार झाले. एकपेशीय जिवांपासून अनेकपेशीय प्राणी तयार झाले. हे समुद्रातील प्राणी पस्तीस कोटी वर्षांपूर्वी जमिनीवर आले. तोपर्यंत जमिनीवर जीवन नव्हते. सुमारे साडेबावीस कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवरील जीवसृष्टी काही कारणाने जवळ जवळ नष्ट झाली.

जवळ जवळ पृथ्वीवरील अर्धे प्राणी नाहीसे झाले. (सुमारे साडेबावीस कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवरची जवळजवळ अर्धी जीवसृष्टी काही कारणाने नष्ट झाली.) या आपत्तीमधून सावरण्यासाठी पृथ्वीला दोन कोटी वर्षं लागली. साडेसहा कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवरचे प्राणी पुन्हा एकदा फार मोठ्या प्रमाणात नष्ट झाले. त्यावेळी पृथ्वीवर महाकाय डायनॉसॉर्सचे राज्य होते. सरपटणारे प्राणी, उडणारे पक्षी, त्याचप्रमाणे जमिनीखाली बिळात राहाणारे सस्तन प्राणीसुद्धा होते. असे समजले जाते की, पृथ्वीवर खूप मोठी उल्का आदळली... त्यामुळे आकाशात धुळीचे आणि धुराचे लोट उडाले... त्यामुळे पृथ्वी झाकोळली. हे कित्येक वर्षं चालू होते. सूर्याची किरणे पृथ्वीवर पोहोचेनाशी झाली आणि हवामानात बदल घडून आला... त्यामुळे डायनॉसॉर्ससारखे पृथ्वीच्या पृष्ठभागावर राहणारे प्राणी नष्ट झाले पण जमिनीखाली बिळात राहणाऱ्या उंदीर, घुशी, डुक्कर यांसारख्या सस्तन प्राण्यांचे प्राण वाचल्याने त्यांपासून पुढे मानवाची निर्मिती झाली. आपल्या आणि उंदरांच्या जनुकसूत्रांत खूप साम्य आहे. त्याचप्रमाणे डुकरांच्या अवयवांचे प्रतिरोपण माणसाच्या शरीरात करण्याचे प्रयत्नसुद्धा चालू आहेत.

(क्रमशः)



- **सभासदांचा सहभाग वाढावा हा हेतू**
- **सभासदांच्या कलागुणांना वाव**
- **चित्रकला, फोटोग्राफी, कथा, लेख, कविता**
- **व्यक्तिगत, कौटुंबिक, व्यावसायिक गवसणी**

**तुमचा लेख आवर्जून द्या....**
**समन्वयक**
**आनंद कुलकर्णी / यामिनी पोंक्षे**

**कलाकारी**

## Book Review

Rtn. IPP Abhijit Joag




The Clash of Civilizations
And the Remaking of World Order
Samuel P Huntington

The Western Civilization has dominated the world for the last 500 years and till a few years ago, it seemed that there was practically no challenge to the domination of the West.

However, in the 21st century, more particularly, after 9/11, Islamic Terrorism has emerged as a serious challenge to the West. Similarly, the emergence of China as an economic powerhouse and a hegemonistic world power, along with other Asian economic success stories are also proving to be the likely challengers to western domination.

'The Clash of Civilizations' written in 1996 has predicted both these forces emerging as threats to the western world. In 1996, both these phenomena were at best in a nascent stage. The uncanny accuracy with which Samuel Huntington has predicted the emergence of these two forces as serious challenges were almost prophetic.

When one reads this book today, he/she is startled by its prescience. It reads as though it was written yesterday.

1500 CE onwards, Renaissance in the western world led to scientific and industrial revolutions which gave the European countries strength, power, and energy to conquer and colonise the world. This resulted in Western ideas, culture, and products dominating minds and markets, the world over.

Post World War II, the era of the Cold War began, during which, Western values of freedom, liberalism and secularism were challenged by the Soviet Block with its Communist ideology of dictatorship of the proletariat and regimented societies. However, after the fall of the Soviet Union, the Western domination of the global narrative became complete and seemingly unchallenged.

However, in this hegemony were the seeds of newer challenges as different groups started looking for new hooks to hang their identity. The author says that through globalization, the West globally pushed for modernization to Western standards, without equal emphasis on pushing Western values. As a result, countries like China, Japan, and South Korea progressed rapidly and yet, promoted their own native cultural values, ignoring those of the West. This dichotomy between modernization and westernization led to the emergence of Asian Giants as a civilizational challenge to the West.

Similarly, post-1970, Islamic countries began to modernize, aided by the rise of Petrodollars. With increasing economic clout and urbanization, these societies started becoming more group conscious and started asserting their distinct identity. This led to the

western-backed secular regimes in their countries giving way to religious theocracies like in the case of Iran.

The author propounds a theory that for a civilization to survive and grow stronger, it needs cohesion and consciousness.

Cohesion is a strong Central Authority that he calls Core State, which politically binds them and provides stability, progress, and prosperity.

Before World War I, the Muslim world was largely controlled by the Ottoman empire that acted as a strong Core State under the leadership of Turkey. But after the fall of the Ottoman Empire, the Muslim World lacked a strong Core State leading to unemployment, poor economic development in non-oil countries, high population growth, and youth alienation.

Consciousness, on the other hand, means strong shared values of culture, language, etc. Muslim World had strong 'consciousness' due to their strong religious sensibilities but poor cohesion, pushing the youth to terrorism and extremism.

On the other hand, a strong cohesion in the form of powerful Core States like the USA, Germany, France, etc.  but they have a poor consciousness due to their policy of multiculturalism, as it dilutes the values that unite Western Civilization. Western Civilization, based on the values of liberalism were further pushed towards multiculturalism out of the guilt trip arising out of Fascism and Nazism as well as colonization.

The author sees multiculturalism as a major threat to the West, particularly the USA. He feels it may lead to the collapse of America's global dominance. He also feels it will be a threat to the Western values of liberty, freedom, and justice.

The author, writing only from a western perspective, advocates staying away from multiculturalism and avoiding an embrace of Asian civilization. Instead, he feels the USA should forge closer bonds with Europe to protect the Western Civilization which is under threat. He feels the west needs to stay committed to its roots and not divide the society by promoting multiculturalism. After Huntington wrote the book, the West has even further opened up to multiculturalism, which is now creating huge disturbances and cultural/ civilizational issues in Europe. These incidences have actually vindicated the author's concerns.

The Clash of Civilizations is one of the most influential books that has shaped political thinking and has probably inspired megatrends in global politics.


- सभासदांचा वेगवेगळ्या विषयांवरचे दृष्टिकोन मांडण्याची जागा...
- हलकंफुलकं लेखन हवं
- पुस्तंक, नाटक, चित्रपट, मालिका, वेबसिरीज
- राजकारण, समाजकारण, चालू घडामोडी

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

**दृष्टिकोन**

## विशेष श्रद्धांजली




आपल्या क्लबचे पी.पी. पांडूरंग तथा काका सावंत (क्लब प्रेसिडेंट २००५-०६) यांचे २४ ऑगस्ट २०२० रोजी दुःखद निधन झाले.
भावपूर्ण श्रद्धांजली!



आपल्या क्लबचे माजी सदस्य अनिरुद्ध कोठुरकर (क्लब सेक्रेटरी १९८६-८७) यांचे २६ ऑगस्ट २०२० रोजी दुःखद निधन झाले.
भावपूर्ण श्रद्धांजली!

## DONATIONS

**Donations to Rotary Poona South Charitable Trust for the year 2020-21**

1. First Lady Ann Sugandha Natu - Rs. 5000/-
2. Ann Nandini Joag - Rs. 5000/-
3. Ann Sunita Prabhune - Rs. 5000/-

**Plasma Donation support Drive**

In order to treat serious Covid patients, plasma therapy is used. In this, blood plasma is collected from Corona cured patients and administered to patients under treatment. This plasma collection process is very expensive and cost per collection is about Rs. 10,000/- while plasma is given to patients at the nominal price. Janakalyan Blood Bank had approached our club to come forward and support this noble cause.We have decided to support them by bearing the cost of some kits partially and plan to give support of Rs.5000/- per kit and for at least ten plasma kits.

Donors will receive certificates of appreciation from Rotary Club of Pune South & Janakalyan Blood Bank.

Towards this, the following members of RCPS have graciously come forward to donate Rs. 5000/- each

1. Rtn Manisha Belgaonkar
2. Rtn Madhuri Kirpekar
3. Rtn Mridula Ghodke
4. Ann Sugandha Natu
5. PP Rtn Govind Patwardhan
6. Ann Sneha Ogale
7. Ann Sunita Prabhune
8. Ann Nandinee Joag

## A Small Contribution

Maitreyee Purnapatre





I am Maitreyee, the daughter of Rtn. Mandar and Ann. Indrayani Purnapatre. I am a final year student of Int. M.Sc. Biotechnology at IBB, Pune University. Reading is one of my most cherished hobbies. I am also fond of languages and dance. I have an avid interest in the fields of neuroscience and immunology. I aspire to elucidate the dialogue between the two systems in order to remedy the cognitive disorders.

I was working on my dissertation project at IISER, Pune when the lockdown was initiated. With a heavy heart, I parted with my exciting work and the stars of my project, my female mice. All the time I was striving to write my thesis, a thought persisted in the back of my mind. The thought that 'I know the techniques that are being used to diagnose Corona virus and so how can I use them to help my city which is grappling with the pandemic'. With this intention, I contacted my guide at IISER to ask if I could volunteer there... but unfortunately, they were allowing only IISER students and staff to perform the testing. I felt dejected but continued with my endeavour to find a way.

In the last week of June, Pune University circulated a notice urging the students to volunteer at the PMC testing centres. I eagerly filled up the Google form and waited for the email to come. I was delighted as I had finally been given the opportunity to help. They conducted a webinar to inform us about the particulars of this Pune University-IISER-PMC joint venture. All the volunteers were left baffled at the end of it because the PMC in-charge had forgotten to get the test kit to show us, the kit that they expected us to use! However, in the spirit of greater good, we decided to take a leap of faith and attend the 'Hands-on' training at Naidu hospital. Surprisingly, that went very well as we had a fun, relaxed in-charge Dr. Jadhav who was simultaneously dealing with a technicians' strike, countless other issues and demonstrating the test. We were initially

shell-shocked at how casually, just in a simple N-95 mask, we had witnessed swab collection and testing at a distance of not more than a foot. It ended with a morale boosting speech by him and tons of photographs and information about our selected centre heads.

I joined Sanas hostel, the pioneer COVID testing centre on 15th of July. I introduced myself to the head technician who allayed my qualms, provided me with a disposable apron, hair net, a pair of goggles and gloves and explained to me the functioning of the centre. He told me how he would let me assist them. However, right from the first day, assistance transitioned into entrusting me with complete testing responsibility. I was now declaring whether the person was positive or negative. I felt elated by this new sense of responsibility. The working environment and staff were so nice that the fear of being just a few feet away from the dreaded virus never set in. This was despite of the fact that the testing room and lunch place were one and the same!

After a week, I decided that I want to perform every possible role at the centre, right from documenting, record-keeping, announcing reports, drafting reports, data entry to the most petrifying yet exciting task of collecting swabs. Thanks to their supportive nature, I did manage to fulfil my wish. I even went for testing at the NMV camp which was organised specially for the shop owners of Laxmi road.

One day, I walked to find the centre decorated and looking exceptionally immaculate. The reason was that we were going to be part of an NDTV telecast! I even got felicitated by Janata Sahakari bank. We, the volunteers were overjoyed upon receiving an invitation from the Vice-chancellor of Pune University to attend flag hoisting.

Throughout the volunteering phase, we received immense support from Dr. Kalpana Pai, head of Zoology department at Pune University and our volunteer in-charge, Jyoti Otageri. I am indebted to my parents for being such brave supporters. I feel blessed to have emerged out of this experience safe and sound.

It was a highly enriching and rewarding experience. Being a COVID warrior was empowering. I am ready to use my knowledge for the benefit of the society in whichever way possible, at the drop of a hat.

I hope we soon recover from this catastrophe. Lots of positivity and good health to you all!

## There is no easy way from the Earth to the Stars!

Rtn. Sangeeta Deshpande









My parents named me Sangeeta for their love of music. I am a practising Dentist (Practitioner Dentist) and an Alumnus of GDC MUMBAI. We at Gentle Hands Dental Clinic offer a whole range of dental treatments for all age groups at our simple, clean and well-ventilated office at Mukund Nagar. We are especially empathetic towards the elderly. Besides my work, Yoga is my passion!

I would like to say am a jack of many trades. When I am not working I like to dabble in cooking (you ought to taste our choorma ladoo ) performing arts, Reading good books for the visually impaired, Birding, Travelling. My new found love is our Holy Bhagwad Geeta.

Husband Dr. Rohit Deshpande is a practising (Practitioner) Orthodontist with a clinic in Camp and works for rescued Canines.

My daughter Shivani, 23 has done B.Sc. in Environment Science at Fergusson with honours and is now pursuing Dentistry at Bharati Vidyapeeth Pune.

Son Umang, 27 is an Alumnus of B J MEDICAL COLLEGE and has been teaching and training students for Medical Entrance Test at Jha's Educational Services.

We have raised them to be kind and compassionate human beings.

**"Depth of friendship does not depend upon the length of Time..."**

**- Rabindranath Tagore**

I joined RCPS in 2019 following the footsteps of my In-Laws Dr. Subhash and Late Dr. Rajani Deshpande. Over the years i have seen the magnanimous work and activities conducted by RCPS. I particularly love the camaraderie amongst the members. I felt I could grow and be a better person if I joined RCPS by learning to help the society at large, by growing intellectually and by gaining in terms of friendship.

Thank You Rotary Club of Pune South for accepting me as a part of your big Family. I hope to contribute substantially in my capacities.

## विशेष

- शुभेच्छा
- स्मृती
- गवसणी
- या महिन्यात मागच्या वर्षांत...

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
श्वेता करंदीकर

## टीम बुलेटिन

## सदरं

- मुखपृष्ठ ..........................श्वेता.............. विधानं/ कोट्स
- संपादकीय/ अध्यक्षीय........योगेश /सुदर्शन
- रोटरी..........................योगेंद्र / अभिजित............... रोटरी मंच/RI
- डिस्ट्रिक कनेक्ट...........योगेंद्र / अभिजित........ डिस्ट्रिक घडामोडी
- क्लबकारी.........................आनंद / यामिनी..........क्लब घडामोडी
- कलाकारी.........................आनंद / यामिनी..........सभासद गुणदर्शन
- दृष्टीकोन.......................योगेंद्र / अभिजित..........पुस्तक, चित्रपट इ.
- विशेष.............................श्वेता....................शुभेच्छा, स्मृती

- क्रिएटिव्ह असिस्टन्स आणि कोऑर्डिनेशन..........टीम सहयोगी